झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे – १६.
जा. क्र. झोपुप्रा/तां.३/प्र.क्र.१५२/झोनिआ/९४६/१४
दिनांक – ५/६/२०१४

# ''झोपडपट्टी निर्मुलन आदेश''

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ ( प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे 'उपरोक्त अधिनियम' असा करणेत येत आहे. ) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो. - २००४ / प्र. क्र. - २१३ / झो. प. सु. - १ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतूदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली असून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. तर्फे श्री. विवेक पाटील यांनी आर्किटेक्ट श्री. राहुल माळवदकर यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर एकूण ६७ झोपड्या असून त्यापैकी ६३ निवासी आणि ०४ बिगर निवासी असे एकुण ६७ झोपडीधारक आहेत. त्यापैकी ३६ निवासी व ० बिगर निवासी झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी २९ झोपडीधारकांनी (८०.५५%) झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३(क)(१) मधील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र कार्यालयाकडील आदेश झोपुप्रा/तां.५/झोपुआ/प्र.क्र.११/२३४९/१३ दि. ०२/०१/२०१४ अन्वये 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित झालेले आहे. सदरचा आदेश हा महाराष्ट्र शासनाच्या दि. ०९/०१/२०१४ रोजीच्या राजपत्रात आणि दि. ०४/०१/२०१४ रोजी दै. डी.एन.ए. व दै. संध्यानंद या दोन स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहीत पध्दतीने प्रसिध्द झाला असून विहीत कालावधीत कोणचीही हरकत प्राप्त झालेली नाही व विशेष न्यायाधिकरणाकडे विहित कालावधीत अपिल दाखल झालेले नाही. 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, विकास देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे उपरोक्त अधिनियमाचे कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी 'निर्मूलन क्षेत्र' म्हणून घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमुद क्षेत्रातील सर्व

झोपडया / बांधकामे हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ६ (सहा) आठवडयाच्या आत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.
२. विकसकाने योजनेचे काम चालू करणेपूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक त्या सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.
३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.
४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल.
६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.
७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबीर रिकामे केले पाहिजे.
८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून ४ (चार) आठवडयांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतुःसिमा |
|---|---|---|
| स.नं. ५३९अ/१६ अ मधील सि.स.नं. ३६२ व ३६३, (पा), फा.प्लॉ.क्र. १६२, घोरपडे पेठ, (लोहियानगर)पुण. | ९६५.२१ चौ. मी. | **पुर्वेस** - फा.प्लॉ.क्र. १६३ अ |
| | | **पश्चिमेस** - फा.प्लॉ.क्र. १६१ |
| | | **उत्तरेस** - रस्ता |
| | | **दक्षिणेस** - फा.प्लॉ.क्र. १६३ |

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधीतांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

" सत्यप्रत "

उप अभियंता
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

(विकास देशमुख)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** ५ / ६/२०१४.